# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर.

(शिक्षण विभाग)

दुरध्वनी क्र. ०७१२-२५६७०२८ Email ID - education.nmc@gmail.com

जा.क्र.3811../शि.वि./२०१५ दि. ४/०३/२०१५

प्रती,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य.शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय – शिष्यवृत्ती परीक्षा २०१५ करीता प्रवेशपत्र (Admission Card) ऑनलाईन उपलब्ध झाल्याबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, २२ मार्च २०१५ रोजी होणाऱ्या इयत्ता ४ थी/७ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेकरीता ज्या शाळांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरले होते. त्या सर्व शाळेतील विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र (Admission Card) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या संकेतस्थळ (www.mscepune.in) किंवा (www.msshss.in) वर उपलब्ध झालेले आहेत. याबाबत मुख्याध्यापकांना SMS येणे सुरू झाले आहे. आपणांस देण्यात आलेला शाळेचा यु-डायस आणि पासवर्ड टाकून लॉगइन करून शाळेतील परीक्षार्थींचे प्रवेशपत्राचे प्रिंटआऊट काढावे. त्यावर विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून त्यावर मु.अ. ची स्वाक्षरी व शिक्का उमटवावा.

प्रवेशपत्रावर दिलेल्या सर्व सूचनांचे पालन करण्याबाबत परीक्षार्थी/परीक्षार्थीचे पालक तसेच संबंधित शिक्षकांना सूचना देण्यात यावी. सर्व परीक्षार्थी शिष्यवृत्ती परीक्षेला उपस्थित राहतील, याची दक्षता घ्यावी. यावर्षी देण्यात आलेल्या परीक्षा केंद्रात कोणताही बदल होणार नाही, याची नोंद घ्यावी.

**शिक्षणाधिकारी**
नागपूर महानगरपालिका, नागपूर.